खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २७२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१४ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# सिंहस्थ कुंभमेळासाठी प्रति आखाडा ५ कोटींचा निधी

## कुंभच्या यशस्वी आयोजनासाठी निधी कमी पडू देणार नाही -मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा हा महाराष्ट्रासाठी सेवेचा आदर्श निर्माण करण्याची संधी आहे. आखाड्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रति आखाडा पाच कोटींचा निधी, छोट्या संस्थानसाठी प्रति संस्थान १५ लाख रुपये, आखाड्यांच्या वीज देयकाची प्राधिकरणाच्या माध्यमातून अदायगी, आखाड्याची जमीन शासकीय कामासाठी अधिग्रहित केल्यास आखाड्यांना मोबदला किंवा जमीन देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.

कुंभमेळ्यासाठी जगभरातून येणाऱ्या साधू, महंत व भाविक यांची सेवा करीत त्यांच्या मार्गदर्शनातून कुंभमेळ्याचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित सिंहस्थ कुंभमेळा आढावा बैठकीत सांगितले.

बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कुंभ मेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिह राजे भोसले आदी उपस्थित होते. बैठकीमध्ये कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी साधू महंतांनी दिलेल्या सूचना स्वागतार्ह असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, साधू, महंतांनी जे चांगले काम होत आहे, त्याचे कौतुक केले आहे. तसेच जे काम अधिक गतीने आणि परिणामकारक व्हायला पाहिजे, त्यासाठी सूचना केल्या आहेत. साधू महंतांच्या बैठकीतील सविस्तर चर्चेने कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी निश्चितच मदत होणार आहे. कुंभमेळ्याच्या व्यवस्थेसाठी बृहद नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुढील वर्षी होत असलेल्या कुंभमेळ्याचे नियोजन आणि तयारी ही केवळ याच कुंभमेळ्यासाठी नसून ती पुढील १२ वर्षांनी येणाऱ्या कुंभमेळ्यासाठी असणार आहे, या पद्धतीने आखलेल्या नियोजनाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पुढील काळात व्यवस्थेला या कुंभमेळ्यासाठी उभारलेल्या कामातूनच पुढील व्यवस्था उभाराव्या लागतील, अशा पद्धतीने काम करण्यात येत आहे. कुंभमेळा निमित्ताने नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात स्थायी स्वरूपात विकासकामे होतील, याचाच प्राधान्याने विचार होत आहे. कुंभमेळा हा भविष्यातही विस्तारणारा असल्याने त्या पद्धतीने व्यवस्थांची उभारणी करण्यात येत आहे.



### कुंभमेळ्याच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड नको - उपमुख्यमंत्री शिंदे

त्रंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी राज्यशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. हे आयोजन अत्यंत दिमाखदार स्वरूपात पार पडेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त करीत या कुंभमेळ्याच्या सुरक्षतेबाबत कुठलीही तडजोड खपवून घेणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. भाविकांची सुरक्षा, सुविधा आणि आखाड्यांच्या मागण्यांबाबतही निर्देश दिले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, कुंभमेळ्यादरम्यान येणाऱ्या भाविकांना किंवा सामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, अशी भूमिका आखाड्यांनी घेतली आहे. या निर्णयाचे स्वागत करत उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आखाड्यांनी दिलेली सूचना अतिशय स्वागतार्ह आहे. सर्वांच्या सहकार्यानेच हा सोहळा यशस्वी होईल.

शासनाला सेवा करण्याची संधी मिळाली असून संपूर्ण प्रशासन एक 'टीम' म्हणून काम करत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे खंबीर पाठबळ असल्याने राज्य वेगाने पुढे जात आहे. मंदिरांचे पुनर्निर्माण आणि धार्मिक स्थळांचा विकास ही आमची प्राथमिकता आहे.

कुंभमेळ्यासाठी सध्या ३७७ एकर जमीन आरक्षित करण्यात आली आहे. मात्र, आखाड्यांनी अतिरिक्त जमिनीची मागणी केली असून, शासन त्याबाबत सकारात्मक आहे. कुंभमेळ्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. भाविकांच्या सोयीसाठी आणि पायाभूत सुविधांसाठी आवश्यक तो सर्व निधी तत्काळ उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

सर्व सुरक्षा यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय राखून काम करावे, जेणेकरून कोणतीही अनुचित घटना घडणार नाही. गर्दीचे नियोजन आणि आपत्कालीन व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. कुंभमेळ्याच्या आयोजनात कुठेही उणीव राहणार नाही, याची दक्षता शासन घेत आहे,असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.

कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी सादरीकरण केले. बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, नाशिक येथील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, १३ आखाड्यांचे महंत व साधू उपस्थित होते. यावेळी आखाड्यांचे महंत यांनी विचार मांडले. बैठकीच्या सुरुवातीला त्र्यंबकेश्वर येथील मंदिराच्या दर्शन पथाचे ई भूमिपूजन करण्यात आले.

त्र्यंबकेश्वर देशामध्ये अत्यंत महत्त्वाचे ज्योतिर्लिंग आहे. गोदावरी नदी उगमाच्या पवित्र सानिध्यामध्ये हा कुंभमेळा होत आहे. त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात कॉरिडॉरचे निर्माण करण्यात येणार आहे. यामुळे भाविकांना मोठ्या प्रमाणावर सुविधा होईल.

तसेच नाशिक येथील कुंड, रामकाल पथ, मंदिर, गुफा यांचाही जीर्णोध्दार करण्यात येत आहे. संपूर्ण नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात अध्यात्म पूरक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. कुंभमेळा निमित्ताने आरोग्य व्यवस्थेचाही बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक साधू, महंत व भाविक यांना आरोग्य विषयक कुठलीही अडचण होणार नाही, याची परिपूर्ण दक्षता घेण्यात आली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

आखाड्यांसाठी असलेल्या जमिनीमधील काही क्षेत्र प्रतिबंधित करण्याकरिता निश्चितच विचार करण्यात येईल. मागील कुंभमेळ्यापेक्षा यावेळेच्या आयोजनामध्ये गोदावरी नदीचे स्वच्छ स्वरूप आपणाला सर्वांना दिसणार आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम करण्यात येत आहे.

# ३ गोवंशाची सुटका, २२ लाख ९५ हजाराचा मुद्देमाल जप्त

## माजरी पोलिसांची मोठी कारवाई...



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** जिल्ह्यातील माजरी पोलीस १२ मे रोजी सकाळी पो.स्टे.हद्दीत पेट्रोलिंगवर असतांना गुप्त माहिती मिळाली की, नागपूरकडून येत असलेल्या एका कंटेनरमधून गोवंश जनावरांची अवैध तस्करी होत आहे. यावरून माजरी पोलीसांनी तात्काळ वरोरा ते वणी हायवेवरील कुचना येथे नाकाबंदी करून संशयीत ट्रक कंटेनरला थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र,चालकाने वाहन न थांबविता यु-टर्न घेवून नागपूरच्या दिशेने पळू लागला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला असता, चालकाने कंटेनर उभा करून वाहन सोडून पळून गेला.

दरम्यान पोलिसांनी सदर वाहनाची तपासणी केली असता, त्यात एकूण ५३ नग गोवंश जनावरे (बैल, गाय, गोरे) अमानुषरित्या भरून कत्तलीसाठी नेत असतांना मिळून आले. यावरून आरोपींविरुद्ध संबंधीत कलमान्वये माजरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ५३ नग जनावरे किं.अं. ७ लाख, ९५ हजार रु. व एक ट्रक कंटेनर क्र.डीडी/०३/आर /९८४०, किं.अं. १५ लाख, असा एकूण २२ लाख, ९५ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी फरार आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन माजरी येथे खालील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राण्यांना निर्दयतेने वागणूक प्रतिबंधक कायदा १९६०: कलम ११(१) (ए. ड, ई, एफ, आय, एल), महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा १९७६ (सुधारीत २०१५) : कलम ५(अ), ९, भारतीय न्याय संहिता कलम २८१, ४५, ३(५), मोटार वाहन कायदा: कलम १८४, २३९, गुन्ह्यांची नोंद केली आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, वरोराचे एसडीपीओ संतोष बाकल, यांच्या मार्गदर्शनात सपोनि. अमित पांडेय, यांच्या नेतृत्वात पोउपनि. हरीदास चोपने, सफौ रमेश तुराणकर, पोअं.ज्ञानेश कोटरंगे, रविंद्र किन्नाके, उमेश उईके, दिलीप मंडल, सर्व पोलीस स्टेशन माजरी,यांनी केली आहे.

# जिंतूर तालुक्यात वादळी पावसाचा तडाखा; जोरदार वाऱ्याने पत्र्यांचे शेड उडाले




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१३, जिंतूर :** जिंतूर तालुक्यात मंगळवारी सायंकाळी अचानक आलेल्या जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने मोठा तडाखा दिला. चारठाणा, आडगाव, बोरी तसेच परिसरातील अनेक गावांमध्ये वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळे पत्र्याचे शेड, गोठे आणि तात्पुरती बांधकामे जमीनदोस्त झाली असून लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी पत्रे उडून गेली तर काही ठिकाणी लोखंडी संरचनाही कोसळल्या. शेतकऱ्यांनी उभारलेले शेड, जनावरांचे गोठे आणि शेती उपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली. चारठाणा परिसरात तर वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की मोठमोठे पत्र्याचे शेड अक्षरशः हवेत उडून काही अंतरावर फेकले गेल्याचे चित्र पाहायला मिळाले. काही भागात वीजपुरवठाही खंडित झाला असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त भागांचा महसूल व कृषी विभागाकडून पंचनामा करण्याची मागणी नागरिक आणि शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने तातडीने मदत जाहीर करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

# मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर

- उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्णय...
- मंत्री व अधिकाऱ्यांचे विदेश दौरे रद्द
- अत्यावश्यक सोडून विशेष विमान, हेलिकॉप्टर दौरे नको

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, मुंबई :** इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन उच्चस्तरीय बैठकीत विविध उपाययोजनांचा आढावा घेतला आणि त्यानुसार मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यावेळी मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ही तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात यावी. बाहेरच्या प्रवासात असताना ताफ्यातील वाहनांची संख्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक नसेल याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक यांची असेल. मंत्री-अधिकाऱ्यांनी कोणतेही विदेश दौरे करु नयेत. मंत्र्यांनी अत्यावश्यक नसेल तेव्हा शासकीय विमान, हेलिकॉप्टर यांचा वापर करु नये,




त्याऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करावा. मंत्री-अधिकारी यांनी आवर्जून मेट्रो आदी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. पहिल्या टप्प्यात किमान एक दिवस असा प्रयोग करावा. अधिकाऱ्यांना बैठकांना बोलावण्याऐवजी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका घ्याव्यात. शासनात वितरित करण्यात आलेल्या वाहनांचा कोटेकोरपणे आढावा घेण्यात यावा.

ऊर्जा बचतीसाठी अनावश्यक होर्डिंग्ज/फ्लेक्सवरील कारवाई वाढवण्यात याव्यात आणि तेथे डेकोरेटिव्ह लायटिंगचा वापर होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले आहेत.

# आदिवासी महिला रेशन दुकानदारावर हल्ला; सरकारी ई-पॉस मशीनची तोडफोड



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१३, पालघर :** पालघर तालुक्यातील सफाळे येथे बाहेर जायचे असल्याने रांग तोडून नंबर घेण्यास नकार दिल्याच्या कारणावरून रास्त धान्य दुकानदार निर्मला प्रदीप पांढरे यांना आरती प्रशांत पाटील हिने मारहाण केल्याची घटना घडली. तसेच तिचा पती प्रशांत पाटील, रा. सरतोडी, याने दुकानातील शासकीय बायोमेट्रिक ई-पॉस मशीनची तोडफोड केल्याप्रकरणी सफाळे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे.

या प्रकारात शासकीय डेटाचेही नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दुकानात घुसून मारहाण झाल्याचा आरोप असतानाही संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी पीडित महिला निर्मला पांढरे यांच्यावरच विरोधी तक्रार घेत तक्रारदारावर दबाव आणल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे आदिवासी समाज तसेच विविध संघटनांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

अक्षराज






## विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी खेळ

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी संयुक्त प्रवेश परीक्षा (नीट युजिसी) रद्द करण्यात आल्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने (एनटीए) मंगळवारी जाहीर केला. ३ मे रोजी घेण्यात आलेल्या नीट प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने घेतला आहे.


तीन मे रोजी झालेल्या या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील तब्बल १२० प्रश्न हे परीक्षेच्या पंधरा दिवसांपूर्वी अंदाज म्हणून वर्तविण्यात आलेल्या प्रश्नसंचिकेतील असल्याचे निदर्शनास आल्या नंतर राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने हा निर्णय घेतला. एकाच प्रश्नसंचिकेतील १२० प्रश्न जसेच्या तसे नीटच्या परीक्षेत येणे ही पेपर फुटीच आहे. नीट सारख्या महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेचा पेपर अशा पद्धतीने फुटणे ही जितकी धक्कादायक बाब आहे तितकीच ती चिंतनीयही आहे. ही परीक्षा रद्द झाल्याने अंदाजे दहा लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. गेली दोन वर्ष रात्रीचा दिवस करून परीक्षा देणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना या निर्णयाचा मोठा फटका बसणार आहे.

भ्रष्ट व्यवस्था आणि काही लोकांनी केलेल्या चुकीची शिक्षा लाखो गुणी आणि मेहनती विद्यार्थ्यांना मिळणार आहे काहीही चूक नसताना या विद्यार्थ्यांना याचा मनस्ताप सहन करावा लागत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून नीटच्या परीक्षेची तयारी केली होती. परीक्षा चांगली गेल्याने चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल या आशेवर असणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा मोठा मानसिक ताण येणार आहे. खेडेगावातून शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना आता आणखी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. त्यांना पुन्हा शहरात जाऊन राहणे, वसतीगृहाचा खर्च करणे, क्लासेस, टेस्ट सिरिज जॉइन करणे यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे त्यामुळे विद्यार्थीच नाही तर पालकही चिंतेत आहे. दोन वर्षाची मेहनत सफल झाली असे वाटत असतानाच पुन्हा परीक्षा देण्याची वेळ आल्याने विद्यार्थ्यांवर मानसिक तणाव आला आहे. वारंवार पेपर फुटीच्या घटना घडत असतील तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या विश्वासाने परीक्षेची तयारी करावी ? ही केवळ परीक्षा व्यवस्थेची चूक नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी केलेला खेळ आहे.

अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होण्याची भीती निर्माण झाली आहे. यापुढे तरी पेपर फुटी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाची स्थापना करताना विद्यार्थ्यांची सोय, गुणवत्ता आणि पारदर्शीपणा हे मुद्दे अधोरेखित करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात गेल्या पाच वर्षात तीन वेळा नीटचा पेपर फुटल्याचे समोर आले आहे. २०२४ सालीही नीट परीक्षेचा पेपर फुटला होता. तेंव्हा नीटचा पेपर वीस ते चाळीस लाखांना विकला गेल्याचे समोर आले होते त्यामुळे घोषित केलेला निकाल बदलण्याची नामुष्की राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणावर आली होती. त्यानंतर राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने नीटची परीक्षा सुरक्षित करण्यासाठीच्या उपाययोजना करणे आवश्यक होते. मात्र तसे झालेले नाही हे यंदाच्या प्रकरणावरून दिसून येते. नीट परीक्षेत पेपर फुटू नये यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना गरजेच्या आहेत.

**- श्याम ठाणेदार**

# विद्यार्थ्यांनो खचून जाऊ नका !




नुकतेच महाराष्ट्र बोर्डाचे आणि सीबीएसईचे दहावी , बारावीचे निकाल लागले त्यासह नव्या वर्गात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची लगबग सुरू झाली असेल. शैक्षणिक परीक्षांचे निकाल लागताच कुठे आनंद तर कुठे नाराजीचे स्वर घराघरांतून उमटायला लागले. मात्र, बारावीच्या परीक्षेत कमी गुण मिळाल्याने नैराश्यात जाऊन नांदुरा शहरातील भीमनगर येथील पायल प्रकाश तिडके या विद्यार्थिनीने केलेली आत्महत्या तसेच निकाल कसा लागेल? या भीतीतून निकालाच्या आदल्याच दिवशी मलकापूर येथील साहिल राणे या विद्यार्थ्याने केलेली आत्महत्या हल्लीच्या शिक्षण व्यवस्थेची पोल खोलून गेल्या आणि विद्यार्थ्यांची मनशक्ती किती कमकुवत होत चालली आहे, याचे बोलके उदाहरण देऊन गेल्या. तिथेच भंडारा जिल्ह्यातील रोंघा येथील नवल होलाराम खंडाते या विद्यार्थ्याने बारावीत नापास झाल्यामुळे केलेली आत्महत्या वाढत्या अपेक्षा ठेवणाऱ्या समाजाला विचार करायला लावून गेली.

शैक्षणिक आयुष्यात नापास झालं किंवा कमी गुण मिळालं म्हणून कुणी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलावे, हे खरे तर न पटण्यासारखे आहे. यश अपयश या तर आयुष्याच्या नाण्याच्या दोन बाजू आहेत. अपयश मिळालेला व्यक्ती पुढे काहीच करू शकत नाही, असे मुळीच नाही आणि यश मिळविलेला व्यक्ती खूप पुढे जातोच असेही नाही. अपवाद काही वगळता. महात्मा गांधी, अल्बर्ट आईन्स्टाईन, आमिर खान, विराट कोहली, इंदिरा गांधी, स्टीव्ह जॉब्ज, गणितज्ज्ञ रामानुजन, सुशीलकुमार शिंदे, सचिन तेंडुलकर, गौरव मोरे, मृदूपाणी नांबी, उमेश खांडबहाले, राधेश्याम चांडक, आयएएस रुक्मणी रियार, आयएएस अंजू, विजय वर्धन, अवनीश शरण आयपीएस मनोज शर्मा, आयएएस इशिता किशोर, कंगना राणावत, काजोल देवगण, अर्जून कपूर अशी उदाहरणे देता येणारी कितीतरी माणसे आपल्या शैक्षणिक आयुष्यात नापास झाली. मात्र, आपल्या कार्यकृत्वाने, जिद्दीने आज त्यांच्या नावाचा जगात डंका वाजला जातो. मग, आपल्याला कमी गुण मिळाले म्हणून आपण सरळ आत्महत्या का करायची?शालेय शिक्षणामध्ये सुद्धा अशा व्यक्तींबद्दल धडे असायला हवेत. त्यातून विद्यार्थी नक्कीच बोध घेतील.

आपणास एखाद्या दगडाची ठेच लागल्यावर परत उठून उभे राहतोच ना! मग, एखाद्या वर्गात नापास झालो तर पुन्हा जिद्दीने अभ्यास करायला काय हरकत आहे? फेब्रुवारीमध्ये राज्यातील शिक्षकांच्या महा टीईटी २०२५ चा निकाल लागला. यात बसलेल्या ४ लाख ४६ हजार एकूण ७३० शिक्षकांपैकी तब्बल ३ लाख ९६ हजारापेक्षा अधिक शिक्षक चक्क नापास झाले आहेत. जिथे शिकविणारा शिक्षकच एखाद्या परीक्षेत अनुत्तीर्ण होतो, तिथे विद्यार्थ्यांनी पुढची तयारी सोडून स्वतः मृत्यूला मिठी मारणे कितपत योग्य आहे, हे नक्कीच तपासले पाहिजे.

दहावी आणि बारावी झाल्यानंतर आज कित्येक कित्येक शैक्षणिक वाटा आहेत. ज्यांना टक्केवारी चांगली मिळाली त्यांना मनासारखे महाविद्यालय आणि शाखा मिळतील. मिळू द्या ना! आपण रुळलेल्या वाटांनी जाण्यापेक्षा दुसऱ्या वाटांनी जाऊ. बिघडलं कुठे? विधात्याने दिलेल्या या नरदेहाचे कर्तृत्वाने सार्थक करायचे सोडून मुलं जेव्हा आत्महत्या करायला निघतात तेव्हा खरे तर हे शिकलेच नाही, असेच वाटून जाते. वास्तविक शिक्षण व्यवस्था टक्केवारीवर अवलंबून राहणारी नको तर विद्यार्थ्यांच्या अंतरीच्या गुणांना वाव देणारी हवी. मात्र, दुर्दैवाने आपल्या देशात सध्या आलेले टक्केवारीचे पिक गाजर गवताप्रमाणे वाढतच चालल्याने आणि पालकांच्या अपेक्षा अधिक वाढल्याने मुलं स्वतःला असे मृत्यूच्या खाईत लोटायला लागले आहेत.

बीसीएच्या अंतिम वर्षात अनुत्तीर्ण झालेला नागपुरातील अर्श नरेश बांते असो नाहीतर नीटची तयारी करणाऱ्या ख्वाहिश देवराव नागरे आणि वैदेही अनिल उईके या हिंगणा एमआयडीसी हद्दीतील विद्यार्थिनी असो जेव्हा अभ्यासाच्या तणावातून आत्महत्या करू लागतात,तेव्हा आपल्या शिक्षण पद्धतीत बदल करणे गरजेचे किती महत्त्वाचे आहे, ते वाटू लागते. पूर्वी सुद्धा बोर्डाच्या परीक्षा असायच्या. मात्र, टक्केवारी आणि त्यावर आधारित प्रवेश प्रणाली तितकी फोफावली नव्हती. त्यामुळे काठावर पास झालेला विद्यार्थी सुद्धा आनंदाने पेढे वाटायचा. मात्र, आता अभ्यासाच्या तणावातून विद्यार्थ्यांच्या आत्महत्या इतक्या वाढल्या की, खुद्द न्यायालयाला याची दखल घ्यावी लागते आहे. हे प्रगतीचे नाही तर देशाच्या नव्या पिढीच्या खच्चीकरणाचे द्योतक आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्वे देशभरात जारी केले आहेत. निदान शैक्षणिक संस्थांनी आतातरी त्याचे पालन करणे गरजेचे आहे. शेवटी विद्यार्थ्यांना एकच सांगावेसे वाटते, निदान जगात यशस्वी झालेल्या माणसांबद्दल एकवेळ तरी नक्की वाचा. यातूनच फिनिक्स भरारी घेण्याची उर्मी तुमच्या पंखात येईल, इतके नक्की. आयुष्य हे खूप सुंदर आहे, त्याला असे पुस्तकी ज्ञानाच्या पारड्यात तोलून नेहमीसाठी गमावू नका. पडले तरी खचून जाऊ नका... उठा! तयारीला लागा!! यशाचा सूर्य तुमची वाट बघतो आहे.

**- लीलाधर दवंडे**
**कामठी (नागपूर)**
**मो. ८४१२८७७२२०**

# पोर्तुगिजांना सळो कि पळो करून सोडणारे छत्रपती संभाजी महाराज !

फोंड्याचा गड पोर्तुगीज-मराठा सरहद्दीवर होता. गोव्यातील पोर्तुगीज सत्तेला शह देण्यासाठी, ती सत्ता आमूलाग्र उपटून टाकण्यासाठी तिला वेढा देण्याचा जो प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी केला, त्यातील फोंड्याचा गड हा एक महत्त्वाचा दुवा होता. त्याचे नाव 'मर्दनगड' होते. त्याच्या भिंती २५ विती रुंद होत्या. भोवताली बुरूज होते. कोटाभोवती खंदक होता. खंदकात पाणीही होते. तसेच बाहेरच्या बाजूस भक्कम तटबंदी होती. अशा तर्हेने तो मर्दनगड नावाला साजेशा गडांमधील मर्द होता. पोर्तुगिजांनी मर्दनगडाच्या तटावर तोफांचा भडिमार चालू ठेवला. तटाला आणखी एक खिंडार पडले. ९ नोव्हेंबरला खिंडीतून आत शिरण्याचा पोर्तुगिजांनी बेत केला. संभाजी महाराज त्या वेळी राजापुरात होते. त्यांचे लक्ष या लढाईकडे लागले होते. 'फोंड्याच्या आघाडीवर आपण स्वतः हजेरी लावायची', असे महाराजांनी ठरवले. ते घाईघाईने फोंड्यास पोचले. त्यांची जिद्द आणि ईर्षा एवढी दुर्दम्य होती की, त्यांनी ८०० स्वारांच्या संरक्षणाखाली ६०० पायदळ सैनिक किल्ल्यात सुखरूप पोचते केले. त्यांचे ते धारिष्ट्य आणि ती बेदरकार वृत्ती पोर्तुगीज पहात राहिले. त्यांच्यावर आक्रमण करण्याचे भानही त्यांना राहिले नाही. संभाजी महाराज युद्धात उतरलेले पहाताच व्हॉईसरॉयने हे युद्ध आपणाला महाग पडणार, याची खूणगाठ मनाशी बांधली. महाराजांची उपस्थिती पाहून मराठ्यांना चेव आला. किल्लेदार येसाजी कंक हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळचा योद्धा. आता तो वृद्ध झाला होता; पण तरुणाला हटवण्याचे शौर्य, धैर्य आणि काटकपणा त्याच्या ठायी होता. त्या वृद्ध युवाने पराक्रमाची शर्थ केली. त्याने आणि त्याचा मुलगा कृष्णाजी याने निवडक सैनिक बरोबर घेऊन गडाबाहेर जाऊन पोर्तुगिजांशी लढा दिला. ज्यांच्याशी ते लढले, त्यांचा त्यांनी पूर्ण पराभव केला; पण त्या हातघाईच्या लढाईत येसाजी आणि त्यांचा पुत्र कृष्णाजी जबर घायाळ झाले. लढाईचा रंग पालटलेला पाहून माघार घेण्याचे व्हॉईसरॉयने ठरवले. १० नोव्हेंबरला पोर्तुगिजांनी माघार घेण्यास प्रारंभ केला. मराठ्यांनी त्यांच्यावर छापे घातले आणि त्यांना सळो कि पळो केले. तोफा, बंदुका मागे टाकून त्यांना पळावे लागले. भाताची ३०० पोती आणि २०० गाढवांवर मावेल एवढे सामान त्यांनी मागे ठेवले.

११ नोव्हेंबरला पोर्तुगीज दुर्भाटला पोचले. नदी ओलांडताच ते आपल्या राज्यात, गोवा बेटात पोचणार होते; पण दुर्भाटच्या परिसरात त्यांना एक टेकडी पार करायची होती. त्या टेकडीवर मराठे सैनिक होते. त्यांच्यावर आक्रमण करून टेकडी ताब्यात घेतल्याखेरीज पोर्तुगिजांना सुरक्षितपणे नदी गाठता येणे शक्य नव्हते. त्यांनी मराठा सैनिकांवर आक्रमण केले. फिरंगी टेकडी चढतांच मराठा सैनिक पळू लागले. मराठ्यांची ती युद्धकला फिरंग्यांच्या परिचयाची नव्हती. ते पळणार्या मराठ्यांचा ईर्षेने पाठलाग करू लागले. मराठ्यांच्या पळण्यात शिस्त होती, चातुर्य होते. फिरंग्यांच्या नजरेत त्या गोष्टी लक्षात आल्या नाहीत. व्हॉईसरॉयने मागे राहिलेले सैन्यही जनरल दो रुद्रीग द कॉश याच्या ताब्यात दिले आणि त्याला मराठ्यांचा पाठलाग करायला पाठवले. त्याच्या साहाय्याला घोडदळही पाठवले आणि मग पळणार्या मराठा सैनिकांनी



**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

उचल खाल्ली. पाठलाग करणारे फिरंगी पांगले होते; पण मागे वळलेले मराठे शिस्तीने आणि एकजुटीने आता तुटून पडले होते. लढाईची ही अनपेक्षित कलाटणी पाहून फिरंगी गर्भगळीत झाले. मराठ्यांनी त्या दिवशी शौर्याचा कहर केला. फिरंग्यांना त्यांनी गारद केले, पायदळी तुडवले. मराठ्यांकडे पायदळ होते. फिरंग्यांच्या घोडदळाशी त्या पायदळाने शौर्याने झुंज दिली. पाठीला ढाली बांधून घोड्याजवळ वाकून ते घोड्यावर वार करत होते. घोड्यावरील स्वार खाली कोसळताच त्याला कंठस्नान घालत होते. पोर्तुगीज व्हॉईसरॉय कोंदि द आल्व्होर मराठ्यांच्या दृष्टीस पडले. त्याला भाल्याने टोचून ठार मारायला काही मराठे धावले; पण ते बचावले. पोर्तुगीज सैनिकांनी आणि अधिकार्यांनी जिवाच्या आकांताने धूम ठोकली. काहींनी पोहून नदी पार केली. या युद्धात पोर्तुगीज पायदळ पूर्णपणे गारद झाले होते. त्यातील क्वचितच कुणी बचावला असेल.

त्या वेळी फोंड्याच्या परिसरातील ५० मुसलमान फिरंग्यांच्या साहाय्याला धावले. त्यांनी साहाय्य केले नसते, तर एकही पोर्तुगीज जिवानिशी निसटला नसता. संभाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्यामधील युद्धात गोव्यातील अन् जवळपासचे देसाई पोर्तुगिजांच्या बाजूने उभे ठाकले. फोंड्याचा दुलबा नाईक देसाई ऐन लढाईच्या प्रसंगी पोर्तुगिजांस वश झाला. पेडण्याचा केशव प्रभुदेसाई हा बारदेशमध्ये फिरंग्यांच्या आश्रयाखाली १६८० च्या ऑक्टोबरपासून रहात होता. त्यानेच कोकणातील देसाई संभाजी महाराजांविरुद्ध पोर्तुगिजांस मिळण्यास सिद्ध होतील, असे व्हाईसरॉयला कळवले होते. डिचोलीचा देसाई वर्ष १६८३ च्या मध्यापासून गोवा बेटात आपल्या कुटुंबासह येऊन राहिला होता. साखळीचे राणे कुंभारजुवे बेटात वर्ष १६८२ पासून वास्तव्य करत होते. रेवाडे, नानोडे आणि पीर्ण येथील वतनदार सत्रोजी राणे हा तर पोर्तुगिजांकडून संभाजी महाराज यांच्या विरोधात लढतांना मराठ्यांकडून कैद झाला होता.

२४ नोव्हेंबर १६८३ या दिवशी रात्री ८ वाजता नदीला ओहोटी लागली असतांना छत्रपती संभाजी महाराजांचे सैन्य जुवे बेटात घुसले आणि त्यांनी किल्ला ताब्यात घेतला. मराठ्यांनी जुवे बेटाचा कब्जा घेतला, ही खबर विजरेईला (पोर्तुगीज शब्द विजरेई - व्हॉईसरॉय) लगेच कळली. दोन तासांनंतर रात्रीचे १० वाजता गोवा शहरात चर्चच्या घंटा वाजवून संकटाची सूचना लोकांना देण्यात आली. पाद्री लोक शस्त्रास्त्रे घेऊन मांडवी नदीच्या बाजूस असलेल्या तटबंदीकडे धावले. धावजीच्या बाजूने शत्रू धडक देईल, असा तर्क करून विजरेई सैन्यासह सगळी रात्र पाळत ठेवून राहिला; पण मराठ्यांनी त्या रात्री काही हालचाल केली नाही. दुसर्या दिवशी २५ नोव्हेंबर १६८३ या दिवशी सकाळी ७-८ वाजण्याच्या सुमारास विजरेईने ४०० शिपायांसह जुवे बेटाकडे चाल केली. विजरेईच्या सैन्याशी मराठ्यांच्या सैन्याने किल्ल्याजवळ मुकाबला केला. हातघाईचे युद्ध झाले. पराभूत होऊन मराठ्यांच्या घोडदळास घाबरून पोर्तुगीज सैनिक विजरेईस सोडून जीव बचावण्यासाठी टेकडीवरून धावत पळत मागे फिरले. त्यांनी नदी गाठण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी विजरेई मराठ्यांकडून कैद झाला असता; पण रुद्रीगु द कोस्त घोडा घेऊन त्याच्या साहाय्यास धावून आला. त्यामुळे तो बचावला. तरी तो घायाळ झालाच. नदी पार करतांना कितीतरी पोर्तुगीज सैनिक बुडून मेले. मराठ्यांनी पळणार्या सैनिकांवर मोठेमोठे दगड ढकलून दिले. दगडाखाली काही सैनिक चेंगरले. जुवे बेट ताब्यात घेतल्यानंतर मराठ्यांनी रात्रीच्या वेळी नदी किनार्यावरील शेताचे बांध फोडून टाकले होते. त्यामुळे नदीचे पात्र रुंदावले होते. पळून जाणारे काही सैनिक चिखलात रुतले गेले. मराठ्यांनी त्यांना कंठस्नान घातले. मोठ्या प्रयासाने विजरेई आणि काही अधिकारी होडीत बसून पळून गेले. पोर्तुगिजांचा हा दारुण पराभव गोवा बेटातील लोकांनी तटावर उभे राहून पाहिला; पण मराठ्यांचा धाक एवढा मोठे होता की, कुणीच विजरेईच्या साहाय्यास धावून आला नाही. ही लढाई संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली लढली गेली. महाराजांना त्याच दमात गोवा बेट सर करायचे होते; पण नदीस भरती आल्यामुळे त्यांना बेत स्थगित करावा लागला. ''ते दिवशी गोवे घ्यायचेच; परंतु फिरंग्यांचे दैव समुद्रांनी रक्षिले'' असे 'खंडो बल्लाळ चिटणीस यांची त्रोटक हकिकत' या लेखात लिहिले आहे.'

**(साभार : स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास खंड १, पहिली आवृत्ती, संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## खापरखेडा येथे त्यागमूर्ती रामाईच्या पूर्ण पुतळ्याचे अनावरण



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** पंचशील बौद्ध विहार खापरखेडा येथे माता रामाईच्या पूर्ण पुतळ्याचे अनावरण उत्साहात करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात भंतेजी बुद्धशील यांनी परित्राण पाठ घेवून केली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व उद्घाटक प्रा. डॉ. जितेंद्र सावजी तागडे, अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा शाखा नवीन बिना, विशेष अतिथी मनोहर डोंगरे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा शाखा खापरखेडा, अतिथी कांता रामटेके, माजी ग्रामपंचायत सदस्य चिचोली-खापरखेडा आणि संरक्षक मीनाक्षी किरण तागडे, सरपंच चिचोली खापरखेडा यांच्या हस्ते फित कापून माता राम ईच्या पूर्ण पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रम अध्यक्ष, पंचशील बौद्ध विहारचे संस्थापक, संचालक व संरक्षक भिमराव तागडे (काकासाहेब) व संरक्षिका प्रभाबाई भिमराव तागडे यांनी तथागत गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अनावरीत त्यागमूर्ती माता रमाईच्या पूर्ण पुतळ्याला माल्यार्पण करून पुष्पांजली अर्पित केली. डॉ.जितेंद्र तागडे यांनी तथागत बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाईच्या पुतळ्यातून मानवता, परोपकार, जिद्द, चिकाटी, त्याग, बलिदान आदि मूल्यांची ज्योत प्रेणास्त्रोत बनून सर्वांसाठी सदैव तैवत राहील, या माता रमाई गुणमूल्य अंगीकृत करण्याचे त्यांनी आव्हान केले.

मनोहर डोंगरे यांनी बुद्धांच्या शिकवणुकीची प्रासंगिकता विषद केली. कांता राम टेके यांनी माता रमाईच्या सहनशक्तीवर प्रकाश टाकला. सरपंच मीनाक्षी किरण तागडे, यांनी माता रमाईच्या कष्टाचे फळ आपण आज चाखत आहोत असे मत व्यक्त केले. कार्यक्रम अध्यक्ष भिमराव तागडे (काकासाहेब) यांनी तथागत, महामानव व त्यागमूर्ती रमाईच्या वैचारिक वारसा मानवतेसाठी फलदायी असून त्याला जपण्याची अपील केली. सम्यक भजन मंडळ चिचोलीने कार्यक्रमाची रंगत वाढवली, कार्यक्रमाची सांगता सामूहिक भोजदानाने करण्यात आली. याप्रसंगी पंचशील विहारचे संरक्षक व संचालक रणजीत तागडे, दिपक धनविजय, मंगला धनविजय, माया बागडे, पत्रकार कपिल वानखेडे, केशव पानतावने, भा.बौ.म. शाखा खापरखेडा माजी अध्यक्ष रामाराव मश्राम, संजीवनी मेश्राम, दिलीप रामटेके, वंदना रामटेके, सारिका तागडे पीयूष वासनिक, निकिता वासनिक, संगीता मेंढे सहित बहुसंख्येने परिसरातील लोक उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना प्रियंका तागडे, सूत्रसंचालन गंगाधर पाटील , तर आभार किरण भीमराव तागडे यांनी मानले.

## चिचोली आरोग्य केंद्रात परिचारिका दिन साजरा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** प्राथमिक आरोग्य केंद्र चिचोली येथे जागतिक परिचारिका दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री पेठकर यांच्या हस्ते परिचारिकांच्या जनक Florence Nightingale यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून द्वीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर केक कापून परिचारिकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित परिचारिकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच सामूहिक छायाचित्र भेट देण्यात आले. परिचारिकांनी इतनी शक्ति हमें देना दाता हे गीत सामूहिकरीत्या सादर करत कॅन्डल प्रज्वलित करून उत्सव साजरा केला. नर्सेस या आरोग्यसेवेचा कणा आहेत. त्या मानसिकदृष्ट्या सक्षम व भावनिकदृष्ट्या संतुलित असतील तर रुग्णसेवा अधिक प्रभावी होते. असे मत वैद्यकीय अधिकारी. डॉ.जयश्री पेठकर यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाला मोनिका लांजेवार, भारती नागदेवे, भाग्यश्री कुळमथे, सारा बुधे, माधुरी उके, विणा वासनिक, वैशाली लोहकरे, तारा नायडू, कविता बोन्द्रे, शुभांगी काकडे, सारिका काकडे, रुबिना शेख, अर्चना कांबळे, रत्नमाला वासनिक, कविता शेंडे, विना पवार, अश्विनी पावडे, संध्या सिरसाम, जयश्री मनवर, देवकला पानतावणे, धिरज टेकाडे, गौतम खोब्रागडे, मुंडले, यशवंत गोटेकर, प्रदीप जांभुळकर,स्वप्नील ढाले,पलाश गोडबोले, आदित्य, पुण्यवान धोटे व दिपाताई यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## पिकविमा प्रकरण तापले : कृषी अधीक्षकांवर संगनमताचे आरोप



**अक्षराज : रहीम कोकर**

**दि.१३, परभणी :** जिल्हा कृषी अधीक्षक दौलत चव्हाण यांच्या कथित अर्थपूर्ण भूमिकेमुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना पिकविम्यापासून वंचित राहावे लागल्याचा गंभीर आरोप लोकप्रतिनिधींनी केला असून, या संपूर्ण प्रकरणावर राज्याचे कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पिकविमा संदर्भात आयोजित ऑनलाईन आढावा बैठकीत आमदार राजेश विटेकर, डॉ. रत्नाकर गुट्टे, संजय बनसोडे, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, कृषी आयुक्त, जिल्हा कृषी अधीक्षक दौलत चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य संग्राम जामकर, शेतकरी प्रतिनिधी गोविंद लांडगे तसेच संबंधित विमा कंपनीचे अधिकारी सहभागी झाले होते.बैठकीत अतिवृष्टी, पुरस्थिती आणि गोदावरी नदीच्या पाण्यामुळे बाधित झालेल्या पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला. यावेळी ओल्या सोयाबीन पिकांच्या आधारे कापणी प्रयोग करून उत्पादन जास्त दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप लोकप्रतिनिधींनी केला. कृषी आयुक्तालयाने वाळलेल्या सोयाबीन पिकांवर आधारित कापणी प्रयोग करण्याचे निर्देश दिले होते. मात्र प्रत्यक्षात ओल्या पिकांच्या उत्पादनाचा आधार घेतल्याम ुळे विमा कंपनीला फायदा झाला आणि शेतकऱ्यांचे तब्बल ४० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला.जिल्ह्यातील ३३ महसूल मंडळांमध्ये पिक कापणी प्रयोग सदोष पद्धतीने पार पडल्याचा मुद्दा बैठकीत गाजला. प्रत्यक्ष परिस्थितीपेक्षा अधिक उत्पादन दाखविल्याने अनेक शेतकरी अपेक्षित विमा भरपाईपासून वंचित राहिल्याची तक्रार करण्यात आली.दरम्यान, कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांनी प्रलंबित १७ महसूल मंडळांचे विमा क्लेम कॅल्क्युलेशन तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. तसेच कापूस आणि तूर पिकांच्या प्रलंबित विमा दाव्यांची रक्कम लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.जिल्हा कृषी अधीक्षकांच्या निलंबनाची मागणी

बैठकीदरम्यान आमदार राजेश विटेकर आणि डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी जिल्हा कृषी अधीक्षक दौलत चव्हाण यांना या संपूर्ण प्रकरणासाठी जबाबदार धरत तात्काळ निलंबनाची मागणी केली. कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांनी यासंदर्भात प्रधान सचिव आणि कृषी आयुक्तांशी दूरध्वनीवर चर्चा केल्याचेही स्पष्ट झाले. त्यामुळे दौलत चव्हाण यांच्या निलंबनाची शक्यता निर्माण झाल्याची चर्चा जिल्ह्यात रंगू लागली आहे.


# २००० ड्रोनच्या भव्य रोषणाईतून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या देशाच्या प्रगतीचे शिल्पकार आहेत. शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व त्यांनी समाजाला पटवून दिले असून, त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही प्रत्येकाच्या जीवनात जाणवतो. समाजातील पुढील पिढीपर्यंत बाबासाहेबांचा विचार पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाम ुळेच सर्वसमावेशक विकास शक्य असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवानिमित्त शिवाजी पार्क दादर येथे प्रथमच ड्रोन शो व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, केंद्रीय सामाजिक




Dr. Babsaheb Ambedkar Drone Show

न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, आमदार अमित साटम, आमदार योगेश सागर, आमदार प्रसाद लाड, आमदार कॅप्टन आर. तमिळ सेल्वन, महापौर रितू तावडे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, सिद्धिविनायक न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर, भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या पुस्तक प्रदर्शनांचा विशेष उल्लेख करत, त्यांच्या विचारांचे सखोल आकलन होण्यासाठी वाचनाची सवय जोपासणे आवश्यक आहे. तसेच, डॉ. आंबेडकर यांच्या जयंती आणि महापरिनिर्वाण दिनी लाखो अनुयायी एकत्र येऊन अभिवादन करतात, ही त्यांच्या कार्याची खरी पोचपावती असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला दया, क्षमा आणि शांतीचे मूल्य दिले. सम नता, समान संधी आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारित त्यांचा विचार आजही मार्गदर्शक ठरत आहे. बाबासाहेबांच्या विचारांवर चालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या यशाची गुरुकिल्ली त्यांच्या तत्त्वज्ञानातच दडलेली आहे. भारतीय संविधान हे जगासाठी मार्गदर्शक ठरणारे असून, त्यावर उभारलेली लोकशाही व्यवस्था, प्रशासकीय यंत्रणा आणि राजकीय व्यवस्था ही समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविण्याचे काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान व त्यांच्या विचारांमुळेच समाजातील सर्व घटकांना समान हक्क आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे.

ड्रोन शो या अभिनव उपक्रम तून नागरिकांना आकाशात बाबासाहेबांच्या कार्याचे नेत्रदीपक दर्शन घडले. बाबासाहेबांच्या विचारांचा जागर देशभरासह जागतिक स्तरावर होत असून, अशा अभिनव उपक्रमांतून नव्या पिढीपर्यंत त्यांचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या ड्रोन शो द्वारे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन करण्यात आले. सुमारे २००० ड्रोनच्या सहाय्याने आकाशात साकारण्यात आलेली प्रकाशचित्रे प्रेक्षकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

# भानेगाव येथे सावित्रीबाई फुले अत्याधुनिक वाचनालयाचे उद्घाटन थाटात

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१२, नागपूर :** ठक्कर बाप्पा योजना सन २०२४-२५ अंतर्गत भानेगाव ग्रामपंचायतीमध्ये उभारण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले अत्याधुनिक वाचनालयाचे उद्घाटन सावनेर-कळमेश्वर मतदारसंघाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. विशेष म्हणजे ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत सावनेर पंचायत समिती अंतर्गत भानेगावातील पहिले अत्याधुनिक वाचनालय ठरले आहे.

सावित्रीबाई फुले वाचनालयाचे उद्घाटन आमदार डॉ आशिष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपक्षेत्रीय प्रबंधक शैल्य कांत पांडे, सरपंच शालिनी चवरे, उपसरपंच सोनू बोरकर, शामराव सरोदे, अनेश चवरे, विपीन नाईक, शंकर बोढे आदि मंचावर उपस्थित होते.

यावेळी आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी वाचनालयाला १० हजार रुपयांची पुस्तके स्वखर्चातून देण्याचे जाहीर केले. पुस्तके ही माणसाची खरी मित्र असतात असे सांगून गावातील प्रत्येक नागरिकानी एक पुस्तक वाचनालयाला दान करण्याचे आवाहन केले. वाचनालयामध्ये केवळ कथा-कादंबऱ्याच नव्हे तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यासाठी स्पर्धा परीक्षा चझडउ/णझडउ, एमझड आणि छएएढ चक्क-उएढ व इतर शैक्षणिक व साहित्य वाचनालयात उपलब्ध करण्यात आली आहे.

गाव वाचेल तर, गाव शिकेल असे सांगून पुस्तकांची आवड असलेल्या नागरिकांना व स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फ



ुले वाचनालयाचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच शालिनी चवरे यांनी केले. याप्रसंगी उपक्षेत्रीय प्रबंधक शैल्यकांत पांडे यांनी वाचनालयाच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले तसेच सीएसआर फंडातून वाचनालयाला इतर अत्याधुनिक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य दर्शना बोरकर, कमलेश भास्कर, पुष्पा जालंदर, मंगला पांडे, धीरज नागरकर यांच्यासह परिसरातील महिला बचत गट व शेकडो नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार ग्राम पंचायत सदस्य अश्विनी अभ्यंकर यांनी मानले.

# सावकारीच्या विळख्यात सापडलेल्या किडणी प्रकरणातील रोशन कुळे यांना दिलासा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हातील नागभीड तालुक्यातील मिंथुर येथील रोशन शिवदास कुळे यांच्या कुटुंबावर ओढवलेल्या आर्थिक संकटाला अखेर दिलासा मिळाला आहे. सावकारीच्या जाचामुळे आणि कर्जाच्या विळख्यात अडकून किडणी विक्रीसारख्या अत्यंत वेदनादायी घटनेला सामोरे जावे लागलेल्या रोशन कुळे यांच्या मदतीसाठी राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लक्ष रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.

रोशन शिवदास कुळे यांची सावकारी कर्जामुळे आर्थिक अवस्था अत्यंत बिकट झाली होती. त्यांच्या शेतजमिनी सावकारांकडे गहाण असल्याने संपूर्ण कुटुंब अडचणीत आले होते. या पार्श्वभूमीवर रोशन कुळे यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या चंद्रपूर येथील जनसंपर्क कार्यालयात येत आपली कैफियत मांडली होती. त्यांच्या कुटुंबाची व्यथा ऐकल्यानंतर आ. मुनगंटीवार यांनी तात्काळ मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करत या प्रकरणात मदत देण्याची आग्रही मागणी केली होती.

यासंदर्भात आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लक्ष रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी शासनाकडे अधिकृत पत्रव्यवहार करत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी मुख्यमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आणि संबंधित विभागांशी समन्वय साधत हे प्रकरण संवेदनशीलतेने मांडले. अखेर मुख्यमंत्री



देवेंद्रजी फडणवीस यांनी रोशन कुळे यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लक्ष रुपये मंजूर करण्याचा निर्णय घेतला.

या मदतीमुळे संकटाच्या अंधारात सापडलेल्या कुळे कुटुंबाला मोठा मानसिक आणि आर्थिक आधार मिळाला आहे. अनेक दिवसांपासून सावकारांच्या जाचाने, कर्जाच्या ओझ्याने आणि भविष्यातील चिंतेने खचलेल्या या कुटुंबासाठी ही मदत म्हणजे नव्या आशेचा किरण ठरली आहे. आमच्या आयुष्यातील अत्यंत कठीण आणि वेदनादायी काळात आमचे दुःख समजून घेत मदतीसाठी धावून येणारे नेतृत्व म्हणजे आ. सुधीर मुनगंटीवार. त्यांच्या संवेदनशील भूमिकेमुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला, अशा शब्दांत कुळे कुटुंबीयांनी आपल्या भावना व्यक्त करत आ. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले आहे.

दरम्यान, येत्या १९ तारखेला चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयात आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते रोशन कुळे यांना ५ लक्ष रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या प्रकरणात संवेदनशील भूमिका घेत विशेष मदत मंजूर केल्याबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांचे आभार म ानले आहेत.

# तहसील प्रशासनाच्या कारवाईने शेतरस्ते खुले; ३५ शेतकऱ्यांना दिलासा...

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१३, सोयगाव :** तालुक्यातील विविध गावांमध्ये अनेक वर्षांपासून बंद असलेले शेतरस्ते महसूल प्रशासनाच्या पुढाकाराने मोकळे करण्यात आले. तहसीलदार मनिषा मेने यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

तहसील कार्यालय, सोयगाव येथे मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ च्या कलम ५ नुसार प्राप्त आदेशानुसार जंगी येथील गट क्रमांक १२३ मधील खातेदार अमरसिंग हिरालाल परदेशी यांचा दोन ते तीन वर्षांपासून अडविण्यात आलेला रस्ता मोकळा करण्यात आला. तसेच सोयगाव येथील गोपाल चौधरी



व त्र्यंबक चौधरी यांच्या मालकीच्या गट क्रमांक ४० मध्ये जाण्यासाठीचा रस्ता खुला करण्यात आला. वेताळवाडी येथील गट क्रमांक ४३ मधील देविदास विष्णू सोनवणे व सिद्धार्थ विष्णू सोनवणे यांच्या शेतात जाण्याचा मार्गही मोकळा करण्यात आला. यानंतर धनवट येथील गट क्रमांक ७३/अ मुलचंद झिपरू जाधव यांच्या शेतात जाणारा दोन वर्षांपासून बंद असलेला रस्ता प्रशासनाने खुला केला. या कारवाईमुळे परिसरातील सुमारे ३० ते ३५ शेतकऱ्यांना थेट लाभ होणार असून शेतीकामासाठीचा मार्ग सुकर झाला आहे. कारवाई दरम्यान नायब तहसीलदार संभाजी देशमुख, मंडळ अधिकारी अरुण पंडीत, मंडळ अधिकारी कल्पना डिघोळे, ग्राम महसूल अधिकारी वैभव जाधव, संतोष राऊत, शिल्पा बोपटे, भगवान सोळुंके तसेच महसूल सेवक संभाजी बोरसे उपस्थित होते.

# आ. जोरगेवार यांच्या पुढाकारातून १७ बालकांना जीवनदानाची नवी आशा

## हृदयात छिद्र असलेल्या बालकांवर मुंबईत होणार मोफत शस्त्रक्रिया

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून जिल्हा सामान्य रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष आरोग्य तपासणी शिबिरातून अनेक गरजू बालकांना जीवनदानाची नवी आशा मिळाली आहे. या शिबिरामध्ये तपासणी करण्यात आलेल्या बालकांपैकी तब्बल ३३ बालकांच्या हृदयात छिद्र (होल) असल्याचे निदान झाले होते. यापैकी पहिल्या टप्प्यात १७ बालकांना पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी ट्रेन ने मुंबई येथे रवाना करण्यात आले आहे. मुंबई येथील किम्स रुग्णालयात या बालकांवर अत्याधुनिक पद्धतीने निशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे या संपूर्ण उपचार प्रक्रियेसाठी लागणारा खर्च विविध शासकीय योजनांमधून तसेच आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून उचलण्यात येणार आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थितीमुळे उपचारांपासून वंचित राहणार्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या बालकांच्या मुंबई प्रवासाची व्यवस्था, राहण्याची सोय, जेवण, वैद्यकीय तपासण्या तसेच शस्त्रक्रियेपर्यंतचा संपूर्ण खर्च उचलण्यात येत असून पालकांनाही आवश्यक मदत उपलब्ध करून दिली जात आहे. उपचारासाठी पाठविण्यात आलेली सर्व बालके ही १८ वर्षांखालील असल्याने त्यांच्या आरोग्याबाबत विशेष काळजी घेतली जात आहे. गरजू व गंभीर आजारांनी ग्रस्त बालकांना योग्य वेळी उपचार मिळावेत आणि आर्थिक अभावामुळे कोणत्याही मुलाचे आयुष्य धोक्यात येऊ नये, या उद्देशाने आमदार किशोर जोरगेवार सातत्याने विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांच्या चेहर्यावर आशेचा किरण निर्माण झाला आहे.

आर्थिक परिस्थितीमुळे कोणतेही बालक उपचारांपासून वंचित राहू नये, हा आमचा प्रयत्न आहे. आरोग्य शिबिरातून हृदयविकाराने ग्रस्त बालकांची वेळेत तपासणी होऊन त्यांना योग्य उपचार मिळत आहेत, ही समाधानाची बाब आहे. या चिमुकल्यांच्या उपचारासाठी आवश्यक असलेली सर्व मदत करण्यात येईल. प्रत्येक बालकाला निरोगी आयुष्य मिळावे, यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.



*** ५ महिन्यांच्या चिमुकलीसह ६ महिन्यांच्या बालकावरही होणार शस्त्रक्रिया* :**

मुंबई येथे उपचारासाठी रवाना करण्यात आलेल्या बालकांमध्ये अवघ्या ५ महिन्यांच्या चिमुकलीचा तसेच ६ महिन्यांच्या बालकाचाही समावेश आहे. इतक्या लहान वयात हृदयात छिद्र असल्याचे निदान झाल्याने पालकांवर मोठे संकट ओढवले होते. मात्र आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून या बालकांना वेळेत उपचाराची संधी उपलब्ध झाली आहे.

या दोन्ही चिमुकल्यांसह सर्व बालकांवर मुंबई येथील किम्स रुग्णालयात निशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येणार असून त्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च विविध शासकीय योजना व आमदार किशोर जोरगेवार यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

# राहुरी खुर्दमध्ये पाणीप्रश्न पेटला; ग्रामपंचायत कार्यालयाला महिलांनी ठोकले कुलूप

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१३, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी खुर्द येथे तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावरून ग्रामस्थांचा संताप अनावर झाला असून संतप्त महिलांनी बुधवार, दिनांक १३ मे २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून जोरदार आंदोलन छेडले. गेल्या अनेक दिवसांपासून गावात पाणीपुरवठा वेळेवर होत नसल्याने नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागत असल्याने अखेर महिलांनी ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली.



**पाणी द्या, मगच कुलूप उघडू; राहुरी खुर्दमध्ये महिलांचा इशारा**

जोपर्यंत गावातील पाणीपुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलूप उघडू देणार नाही, असा इशारा आंदोलनकर्त्या महिलांनी दिला. ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच उपस्थित नसल्याने महिलांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच ग्रामपंचायत सदस्यही कार्यालयात अनुपस्थित असल्यामुळे ग्रामस्थांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

महिलांनी सांगितले की, आम्ही नियमितपणे व वेळेवर पाणीपट्टी भरत आहोत. मात्र तरीही नागरिकांना पुरेसा व नियमित पाणीपुरवठा मिळत नाही. अनेकदा दोन-दोन दिवस नळाला पाणी येत नाही. पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. यामुळे महिलांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीकडून १४ गाव पाणीपुरवठा योजनेची पाण्याची टाकी पूर्ण क्षमतेने भरत नसल्यामुळे गावाला कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे, असे कारण सांगण्यात आले. मात्र ग्रामस्थांनी हे कारण मान्य करण्यास नकार देत प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

आंदोलनावेळी १४ गाव पाणीपुरवठा योजना सदस्य आयुब पठाण, शिवाजी शेंडे, शौकत इनामदार, ग्रामविकास अधिकारी प्रभाकर चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य राम तोडमल, आश्विनी कुमावत, असफ पठाण आदी उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थ महिलांनी प्रशासनाला धारेवर धरत पाणीप्रश्न तात्काळ सोडविण्याची मागणी केली.

या आंदोलनात जयश्री गाडे, मनिषा कारंजकर, स्वाती पवार, कविता पेंडभाजे, चंद्रकला खोजे, वैशाली क्षिरसागर, माया क्षिरसागर, शम्मू शेख, छाया मेहेत्रे, हेमा लालबागे, अर्पणा पवार, सुनंदा मोरे, मंगला कोरके, अनिता डोंगरे, नंदिनी डफळ, मंगला सांगळे, पूजा जाधव, सारिका वाकचौरे, रंजना दातीर, उमा मेहेत्रे, हौसाबाई चांदणे, सकुबाई चांदणे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या.

तसेच निसारभाई शेख, पुंजा आघाव, लखन डोकडे, अन्सार पठाण, राजेंद्र खोजे, रफिक शेख, अशोक वाकचौरे, रंगनाथ चोपडे, संजय थोरात, जगन्नाथ भोसले, मनोहर गायकवाड, अनिल आढाव, राजेंद्र थोरात, योगेश गरड, अशोक जाधव, सकलेन शेख, फारूक सय्यद, रामनाथ डोके, बाबा आढागळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील वाढत्या पाणीटंचाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# राष्ट्रीय काँग्रेस चे युवा अध्यक्ष उदय भानू चिब यांचा भाजपवर हल्लाबोल

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१२, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर शहर जिल्हा युवा काँग्रेसच्या वतीने मंगळवार, दि.१२ रोजी सकाळी ११ वाजता 'युवा मिलाफ' या कार्यक्रमाचे आयोजन एस.के. स्टोन, मिरा रोड परिसरात करण्यात आले होते. शहरातील युवकांना पक्षाच्या विचारधारेशी जोडण्यासाठी व संघटन बळकट करण्यासाठी हा मेळावा घेण्यात आला.




या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती भारतीय युवा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब व महाराष्ट्र प्रदेश युवा काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मुझ्झफर हुसेन, शालवी शुक्ला व स्थानिक पदाधिकारी राकेश राजपुरोहित, दीपक बागडी, रवी खरात, सिद्धेश राणे आणि काँग्रेसचे सर्व नव नगरसेवक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी शहर काँग्रेसचे वरिष्ठ पदाधिकारी, माजी नगरसेवक व शेकडो युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना उदय भानू चिब म्हणाले, देशात बेरोजगारी, महागाईने युवक त्रस्त आहे. भाजप सरकार फक्त घोषणा करते, प्रत्यक्षात नोकऱ्या देत नाही. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' विचाराने देश जोडायचा आहे. मिरा-भाईंदरचा प्रत्येक युवक काँग्रेसचा संदेश घराघरात पोहोचवेल, हा विश्वास आहे. २०२९ च्या निवडणुकीसाठी आतापासून तयारीला लागा. मोदीजींच्या दरवर्षी २ करोड नोकऱ्या देण्याच्या आश्वासनाची खिल्ली उडविली.

शिवराज मोरे यांचे आवाहन : महाराष्ट्र युवा काँग्रेस अध्यक्ष शिवराज मोरे म्हणाले, राज्यातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारने युवकांची फसवणूक केली आहे. पोलीस भरती, शिक्षक भरती रखडली आहे. कंत्राटी पद्धतीने युवकांचे शोषण सुरू आहे. काँग्रेसच युवकांना न्याय देऊ शकते. 'युवा मिलाफ'च्या माध्यमातून बूथ पातळीपर्यंत संघटन बांधणार आहोत.

मुझ्झफर हुसेन ह्यांनी युवकांनाही उत्साह भरत सल्ला दिला युवा काँग्रेस ने आपले आंदोलन रस्त्यावर केले पाहिजे वेळपडली तर जेल जावे लागले तर जावे. युवा नेता बण्यासाठी केसेस अंगावर घेता आले पाहिजे.

मुझ्झफर हुसेन ने युवकांमध्ये जोश भरला. युवा मिलाफ कार्यक्रम मध्ये आफ्रिन हुसेन ने १० वी व १२ वी मध्ये ८०% पेक्षा जास्त मार्क मिळविण्याऱ्या मुला मुलींचे सत्कार राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब व प्रदेश अध्यक्ष शिवराज मोरे, नगर सेवक अफ्रिन हुसेन ह्यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच गिग कामगारांना ५ लाखाचे अॅक्सिडेन्ट विमा कार्ड देण्यात आले.

**कार्यक्रमातील ठराव**

१. प्रत्येक वॉर्डात 'युवा काँग्रेस कमिटी' स्थापन करणार.

२. बेरोजगार युवकांसाठी हेल्पडेस्क सुरू करणार.

३. महापालिका निवडणुकीसाठी युवकांना ५०% उमेदवारी देण्याची मागणी.

४. सोशल मीडियावर भाजपच्या 'खोट्या प्रचारा'ला उत्तर देण्यासाठी 'डिजिटल वॉर रूम' तयार करणार.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर युवा काँग्रेस अध्यक्षांनी केले. 'भारत जोडो', 'जय काँग्रेस'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. मेळाव्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षांनी युवकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब व प्रदेश अध्यक्ष ह्यांनी पत्रकार परिषद ही घेतली.

# थोडक्यात

## आसुडगाव आगाराचा २१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**



**दि.११, खारघर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम (एन.एम.एम.टी.) अंतर्गत कार्यरत असलेली एन एम एम टी बस सेवा ही नवी मुंबईकरांची जीवन वाहिनी म्हणून ओळखली जाते. नवी मुंबई शहरासह ठाणे मुंबई आणि पनवेल परिसरात दररोज हजारो प्रवाशांना सुरक्षित विश्वासार्ह आणि किफायतिशीर सार्वजनिक प्रवासी सेवा पुरवणाऱ्या या उपक्रमाच्या आसुडगाव आगाराचा २१ वा वर्धापन दिन नुकताच उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या वर्धापन दिनानिमित्त आगारात सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. तसेच उपस्थितितांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी आगार परिसरात भक्तिमय आणि आनंदी वातावरण पाहायला मिळाले. एन .एम .एम .टी ची बस सेवा ही केवळ प्रवाशांचे साधन नसून नवी मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. शहराच्या विविध भागांना जोडत प्रवाशांना वेळेत आणि सुरक्षित सेवा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य एन.एम.एम.टी करत आहे. विशेषतः कामगार विद्यार्थी महिला, आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ही सेवा मोठा आधार ठरत आहे. या कार्यक्रमाप्रसंगी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन समितीचे विद्यमान सभापती विकास झंजाड, परिवहनचे मुख्य लेखा वित्त अधिकारी तुषार दौंडकर, मुख्य वाहतूक अधिकारी उमकांत जंगले, वाहतूक अधीक्षक सुनील साळुंखे, तसेच श्रमिक सेना युनियनचे सरचिटणीस चरण जाधव, आगार व्यवस्थापक भगवान भोईर, प्रमुख सल्लागार किशोर पाटील, तुर्भे आगार व्यवस्थापक जगताप साहेब अध्यक्ष भरत कोळी, संजय कोळी, अमोल भोसले, सतीश कोळी, भाऊसाहेब पगारे, यांच्यासह युनियन पदाधिकारी आणि चालक वाहक कर्मचारी मोठ्या वेळी उपस्थित होते.

## अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सवर कारवाई करा- परिवहन मंत्री सरनाईक यांचे सायबर क्राईम विभागाला पत्र

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, मुंबई :** राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप सेवा तात्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर एफआयआर दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सायबर क्राईम विभागाकडे पत्राद्वारे केली आहे. त्याचबरोबर परिवहन आयुक्त यांनी देखील यासंदर्भात सायबर क्राईम विभागाकडे पत्र पाठविले आहे.मंत्री सरनाईक यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध ॲप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे.या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, शासनाच्या परिवहन नियमांचे खुलेआम उल्लंघन करून या ॲप्समार्फत आर्थिक व्यवहार सुरू असल्याने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर अन्यायकारक परिणाम होत असल्याचे परिवहन विभागाने म्हटले आहे.सायबर क्राईम विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित ॲप कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

## नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथे पीठासीन अधिकारी नियुक्त

### आ. सुधाकर अडबाले यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. १३ चंद्रपूर :** नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी पद गेल्या १८ महिन्यांपासून रिक्त होते. याबाबत मा. उच्च शिक्षणमंत्री, सचिव यांच्याकडे नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आ. सुधाकर अडबाले यांनी सतत पाठपुरावा केल्यानंतर विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथे नियमित पीठासीन अधिकारी नियुक्त करण्यात आले. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय निर्गमित केला.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ कलम ८१ अन्वये राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणेची स्थापना करण्यात आली आहे. सदर न्यायाधिकरणाची कार्यक्षेत्र ही विद्यापीठ व संलग्नित खाजगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सेवाविषयक याचिका व अपील याचिका यांचा निपटारा करण्याची तरतुद विषद करण्यात आली आहे. परंतु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, संत गाडगे महाराज अमरावती विद्यापीठ अमरावती व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली कार्यक्षेत्रातील नागपूर स्थित विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी दि. ३०/१०/२०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्याने गेल्या १८ महिन्यांपासून नियमित अधिकारी नियुक्त केलेले नव्हते. याबाबत आ. सुधाकर अडबाले यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सचिव रेड्डी यांच्याकडे सतत पत्र व्यवहार व प्रत्यक्ष भेटी घेऊन पाठपुरावा केला. त्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पीठासीन अधिकारी पदावर न्यायमूर्ती श्रीमती मुकुलिका श्रीकांत जवळकर (मा. उच्च न्यायालय, मुंबई) यांची तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येत असल्याचा शासन निर्णय निर्गमित केला. पिठासीन अधिकारी नियुक्त केल्यामुळे खाजगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आ. सुधाकर अडबाले यांचे आभार मानले आहे.